# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:25.03.2025** **वार:मंगळवार**

---

1. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांना 'भारतरत्न' पुरस्काराने सन्मानित करण्याचा ठराव विधीमंडळात एकमतानं मंजूर
2. राज्यातल्या कायदा सुव्यवस्थेसह विविध प्रश्नांवर सरकार अपयशी ठरल्याची विरोधकांची अंतिम आठवडा प्रस्तावातून टीका
3. राज्याच्या शालेय शिक्षण धोरणात मराठी भाषेचा सन्मान उंचावण्यावर भर देणार असल्याची शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांची विधानसभेत ग्वाही आणि
4. दिव्यांगांच्या खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्राच्या महिला खेळाडूंची चमकदार कामगिरी

**विधिमंडळ**

क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना मरणोत्तर 'भारतरत्न' पुरस्काराने सन्मानित करण्याचा ठराव काल विधीमंडळात एकमतानं मंजूर करण्यात आला. विधानसभेत राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी हा ठराव मांडला.....

***महाराष्ट्र विधानसभा याद्वारे क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना 'भारतरत्न' ह्या सर्वोच्च पुरस्कारानं मरणोत्तर सन्मानित करण्याची शिफारस भारत सरकारला करत आहे.***

हा ठराव एकमतानं मंजूर करण्याचं आवाहन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं.......

***एकमतानं हे मान्य करून केंद्र सरकारला शिफारस करूयात की महात्मा जोतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना याठिकाणी 'भारतरत्न' भारत सरकारने प्रदान करावा***

विधानसभेच्या उपाध्यक्षपदासाठी, उद्या म्हणजे 26 मार्चला निवडणूक घेण्यात येईल, त्यासाठी आज अर्ज दाखल करता येतील आणि उद्या सकाळी अकरा वाजेपर्यंत अर्ज मागे घेता येतील अशी घोषणा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी काल विधानसभेत केली.

राज्यातल्या कायदा सुव्यवस्थेसह विविध प्रश्नांवर सरकार अपयशी ठरल्याची टीका विरोधी पक्षांनी काल विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावातून केली. जमीन अधिग्रहण झाले नसताना, इतर विभागांच्या परवानग्या आलेल्या नसतानाही, बेकायदा पद्धतीनं अनेक नवीन मार्गांच्या कामाचे आदेश घाईनं देण्यामागे नेमका कोणाला रस होता, असा सवाल जयंत पाटील यांनी केला.

परभणी येथील सूर्यवंशी यांचा मृत्यू, बीड जिल्ह्यातील सरपंच देशमुख यांची हत्या, बदलापूर इथल्या घटनेतील आरोपी अक्षय शिंदे याचा एन्काऊंटर, आणि नागपूर दंगल, यासारख्या विविध मुद्दयांवरून विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सरकारवर टीका केली.

विनोदी कलाकार कुणाल कामरा विरोधात कठोरात कठोर कारवाई करण्याचं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत दिलं. संविधानाने प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिलं असलं; तरी यातून दुसऱ्याला अपमानित करण्याचा अधिकार कोणालाही नाही. अशा गोष्टी सहन करणार नाही, असं मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं. शिवसेना आमदार अर्जुन खोतकर यांनी हा मुद्दा उपस्थित करत कुणाल कामरा याच्या अटकेची मागणी केली. कुणाल कामरा यानं जनभावना व्यक्त केली असल्याचं माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे बातमीदारांशी बोलताना सांगितलं.

दरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबद्दल अपमानजनक टिप्पणी केल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी कुणाल कामरा याच्याविरोधात प्राथमिक माहिती अहवाल दाखल केला आहे. तसंच या कार्यक्रमाचं चित्रीकरण ज्या स्टुडिओत झालं, त्या स्टुडिओची आणि हा स्टुडिओ असलेल्या हॉटेलची तोडफोड करणाऱ्या 40 शिवसेना कार्यकर्त्यांविरुद्धही पोलिसांनी तक्रार नोंदवून घेतली आहे. या प्रकरणी शिवसेना कार्यकर्ता राहुल कनालसह 11 जणांना पोलिसांनी अटक केली आहे.

कोयना प्रकल्पाचा अंतर्भाव कृष्णा खोरे विकास महामंडळात करण्याबाबतची तरतूद असणारं महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ सुधारणा विधेयक काल विधानपरिषदेत मंजूर करण्यात आलं.

महामार्गांचं संरेखन झाल्यानंतर भूसंपादनासाठीच्या एका वर्षाचा कालावधी वाढवून दोन वर्षांचा करण्यासाठीचं महाराष्ट्र महामार्ग सुधारणा विधेयक, तसंच महाराष्ट्र मुद्रांक सुधारणा विधेयक देखील सभागृहानं मंजूर केलं. आता ऑनलाइन शुल्क भरून ई-मुद्रांक प्रमाणपत्र घरबसल्या मिळवता येईल, असं महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हे विधेयक मांडताना सांगितलं.

अधिवेशनाचे शेवटचे दोन दिवस उरले असल्याने, संख्याबळ न पाहता विधानसभेत विरोधी पक्षनेत्याची नेमणूक करावी, अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

**<u>शालेय शिक्षण धोरण-भुसे</u>**

राज्याचं शालेय शिक्षण धोरण राबवताना मराठी भाषेचा सन्मान आणि स्थान अधिक उंचावण्यावर कटाक्षाने भर देण्यात येईल अशी ग्वाही शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी काल विधानसभेत दिली. या संदर्भात झालेल्या अल्पकालीन चर्चेला ते उत्तर देत होते. विद्यार्थी हा केंद्रबिंदू आणि शिक्षक हा मानबिंदू मानून, शालेय शिक्षणाचा दर्जा अधिक उंचावण्यासाठी शिक्षण विभाग अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबवताना महाराष्ट्राच्या उज्ज्वल शैक्षणिक परंपरेला आधुनिक शिक्षण प्रणालीशी जोडण्याचा संकल्प असल्याचं भुसे यांनी सांगितलं.

**<u>शिवराजसिंग चौहान</u>**

देशातील शेतकऱ्यांच्या हिताला केंद्र सरकारचं सर्वोच्च प्राधान्य असून कांद्यावरील निर्यात शुल्क हटवल्यानं शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असल्याचं केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी म्हटलं आहे. ते काल नवी दिल्लीत माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलत होते. यावेळी बोलताना ते म्हणाले.....

***प्याज पर चालीस पर्सेंट एक्सपोर्ट ड्यूटी लगती थी लेकिन जब प्याज के दाम कम होने शुरू हुए और किसान को कम दाम मिलना प्रारंभ हुए तब सरकार ने एक फैसला पिछले दिनों किया था कि प्याज अगर एक्सपोर्ट करते हैं तो एक्सपोर्ट ड्यूटी घटा के चालीस पर्सेंट से बीस पर्सेंट कर दी जाए और अब ये फैसला किया है कि बीस पर्सेंट एक्सपोर्ट। ड्यूटी को भी घटा के जीरो कर दिया जाए। प्याज के एक्सपोर्ट पर अब कोई एक्सपोर्ट ड्यूटी नहीं लगेगी ताकि हमारे किसानों द्वारा मेहनत से उपजाया हुआ प्याज दुनिया के बाजारों में बिना एक्सपोर्ट ड्यूटी के जाए और किसानों को अच्छे दाम मिल पाएं लाभकारी मूल्य मिल पाए।***

**जागतिक क्षयरोग दिन**

जागतिक क्षयरोग निर्मूलन दिनानिमित्त काल राज्यात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. रत्नागिरी तसंच हिंगोली जिल्ह्यातल्या क्षयरोगमुक्त ग्रामपंचायतींना काल सन्मानित करण्यात आलं. सांगली महापालिका तसंच वाशीम जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागानं जनजागृती फेरी काढली; वाशिममध्ये पथनाट्याचं सादरीकरणही करण्यात आलं होतं. धुळ्यात, क्षयरोग मुक्त भारत अभियानाची शपथ घेण्यात आली. गडचिरोलीत क्षयरुग्णांचं निदान करण्यासाठी कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर केला जात आहे.

**परिवहनमंत्री आदेश**

एसटी महामंडळातल्या 3 वर्षांपेक्षा जास्त काळ एकाच मुख्यालयात कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांची तातडीनं इतर ठिकाणी बदली करण्याचे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला दिले आहेत. एसटी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसंदर्भात आयोजित केलेल्या बैठकीत ते काल मुंबईत बोलत होते. यावेळी कर्मचाऱ्यांच्या आर्थिक मागण्यांसंदर्भात सविस्तर चर्चा झाली.

**पालिका कारवाई-नागपूर**

नागपूर हिंसाचार प्रकरणातला मुख्य आरोपी फहीम खान याचं नागपुरातलं राहतं घर काल पाडण्यात आलं. नागपूर महापालिकेनं काही दिवसांपूर्वी त्याचं दुमजली अनधिकृत बांधकाम पाडण्यासाठी नोटिस बजावली होती. मात्र त्यानं हे बांधकाम हटवलं नसल्याने, काल कडक पोलिस बंदोबस्तात पालिकेच्या अतिक्रण विरोधी पथकानं ही कारवाई केली.

**कोरटकर-कोल्हापूर**

छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आक्षेपार्ह टिप्पणी तसंच इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत यांना धमकी दिल्याप्रकरणी प्रशांत कोरटकरला काल कोल्हापूर पोलिसांनी तेलंगणमध्ये अटक केली. कोरटकराचा अटकपूर्व जामीन न्यायालयानं फेटाळल्यानंतर काही दिवसांपासून तो फरार होता.

**विजबिल-कोल्हापूर**

महावितरणनं विजबिल वसूली मोहीम तीव्र केली असून, 31 मार्च अखेर सर्व सुट्टीच्या दिवशी ही वीजबिल भरणा केंद्र सुरू राहणार आहेत. वसुलीसाठी वीजपुरवठा खंडित करण्याचे आदेश कर्मचाऱ्यांना देण्यात आले आहेत. त्यामुळे वीज ग्राहकांनी चालू तसंच थकीत वीजबिल भरून आपली गैरसोय टाळावी, असं आवाहन कोल्हापूर महावितरणनं केलं आहे.

**शेतकरी ओळख क्रमांक**

राज्यात आतापर्यंत 76 लाख 39 हजार 852 शेतकऱ्यांना ओळख क्रमांक देण्यात आला आहे. यात अहिल्यानगर जिल्ह्यानं आघाडी घेत 5 लाखांचा टप्पा ओलांडला आहे. तर नाशिक जिल्हा 4 लाख 50 हजार 640

ओळख क्रमांक देऊन दुसऱ्या क्रमांकावर आहे. पुणे जिल्हा तिसऱ्या क्रमांकावर असून जिल्ह्यात एकंदर 4 लाख 34 हजार 632 शेतकऱ्यांना ओळख क्रमांक देण्यात आला आहे.

**खेलो इंडिया**

नवी दिल्लीत सुरू असलेल्या खेलो इंडिया पॅरा स्पर्धेत कालचा दिवस महाराष्ट्राच्या महिलांनी गाजवला. ॲथलेटिक्समध्ये अकुताई उनभगत हिने गोळाफेकमधील एफ-40 प्रकारात सुवर्णपदक जिंकलं. याच प्रकारात महाराष्ट्राच्या रूही शिंगाडेने कास्य पदकाची कमाई केली. नांदेडच्या भाग्यश्री जाधवने गोळाफेक प्रकारात सुवर्ण कामगिरी केली. भारोत्तोलनात महिलांच्या 50 किलो वजनी गटात नागपूरच्या प्रतिमा भोंडेने सुवर्ण पदकाला गवसणी घातली.

**उष्माघात विशेष कक्ष**

राज्याच्या विविध भागात उष्णतेची तीव्रता वाढत असून उष्माघाताच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक आरोग्य विभागानं नागरिकांना खबरदारीचा इशारा दिला आहे. आरोग्य विभागानं सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये उष्णतेशी संबंधित समस्यांवर उपचार करण्यासाठी विशेष कक्ष सुरू केले आहेत. सर्व जिल्हा आणि महापालिका स्तरांवरील साथरोग वैद्यकीय अधिकाऱ्यांना उष्माघात विषयक प्रशिक्षण देण्यात आलं आहे. राज्यात 21 मार्चपर्यंत उष्माघाताचे 21 रुग्ण आढळून आले आहेत.

**पाऊस-सोलापूर**

सोलापूरात गेल्या काही दिवसांत तापमानाचा पारा 41 अंशापर्यंत पोहचला होता. मात्र, काल दुपारी सोलापूरमध्ये काही भागात वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस झाला. अचानक आलेल्या या पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली.

**हवामान**

येत्या 24 तासात विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**